# प्रकरण पाचवे

## उपसंहार

## प्रकरण पाचवे

## उपसंहार

मराठी ग्रामीण साहित्याची निर्मिती करणा-या लेखकामध्ये श्री·आनंद यादव हे महत्त्वाचे लेखक आहेत· ग्रामीण कथात्मक साहित्यात त्यांनी वैशिष्टयपूर्ण कामगिरी केली आहे· गेल्या पाच-सहा वर्षात ग्रामीण साहित्याबद्दल एक भूमिका मांडण्याचा सातत्याने प्रयत्न चालविला आहे· त्यांच्या या भूमिकेमुळे ग्रामीण साहित्याच्या अंत:स्वरूपाचा शोध नित्याने घेणे निकडीचे वाटू लागले आहे· खुद्द यादव हे ही एक महत्त्वाचे ग्रामीण लेखक असल्याने त्यांच्या साहित्याचे एका निश्चित भूमिकेवरून आकलन व मूल्यमापन करण्याचे योजिले आहे·

हे आकलन-मूल्यमापन करताना ग्रामीण साहित्याच्या स्वरूपाबद्दल व गुणवत्तेबद्दल निश्चित भूमिका स्वीकारणे आवश्यक ठरते· या भूमिकेनुसार ग्रामीण साहित्याचे नागर साहित्याहून वेगळेपण सांगून ग्रामीण साहित्यामध्ये समाजाचे व मनाचे चित्रण काही विशिष्ट प्रकारचे असते काय ? त्याचा शोध घ्यावा लागेल या शोधानंतर ग्रामीण साहित्याच्या मूल्यमापनासंबंधी काही निकष उपलब्ध होण्याची शक्यता आहे· त्या कथांच्या निकषानुसार त्यांच्या कथांचे आकलन व मूल्यमापन केले असता त्यांच्या लेखनासंबंधी नवे निष्कर्ष काढता येण्याची शक्यता वाटते म्हणून येथे तशा प्रकारचा अभ्यास करण्याचे योजिले आहे·

पहिल्या प्रकरणामध्ये ग्रामीण जीवनातून ग्रामीण साहित्य कसे अवतरत असते याचा विचार केला आहे· संपूर्ण गावच एखाद्या बृहत्कुटुंबाप्रमाणे वागत असते· तेथल्या माणसांच्या वागणुकीतून एक स्वरूपाची जवळीकता अनुभवला येते· आर्थिक सबळ पाठिंब्यावरच एखाद्याचे मोठेपण

सिध्द होते असे नाही तर ग्रामीण व्यवहारातून निर्माण झालेल्या एकोप्यालाही विशेष महत्त्व असते. ग्रामीण जीवनाला फार मोठी सांस्कृतिक परंपरा आहे. अनुभूतीच्या अपरिहार्य आविष्कारातूनच ग्रामीण साहित्याची निर्मिती व्हायला हवी. नागर साहित्याची व्यक्तिकेंद्रितता आणि ग्रामीण साहित्यातील समष्टीप्रधानता यांचा विचार केला आहे.

दुस-या प्रकरणामध्ये 'मातीखालची माती' या संग्रहाचा समाजाचे आणि व्यक्तिमनाचे चित्रण या संदर्भात विचार केला आहे. ग्रामीण जीवन हे समष्टीप्रधान आहे. संपूर्ण गावच एका व्यापक कुटुंबाप्रमाणे सहजीवन जगत असते. ग्रामजीवनामध्ये शेती हाच मुख्य व्यवसाय आहे. शेतकरी हा केंद्रस्थानी मानून तशा स्वरूपाने समाजाची रचना झालेली असते. या कथासंग्रहातील ब-याचशा कथांतून शेती व्यवसाय व शेतकरी शेतमजूर व ग्रामीण जीवनातील धर्मश्रध्दा व अंधश्रध्दा संकेत यांचे चित्रण आलेले आहे. तसेच शेतकरी व शेतमजूर यांच्या दारिद्र्याचे वास्तव चित्र करण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. समाजजीवनाचा एक भाग म्हणूनच व्यक्तिमनाचे दर्शन घडते. लेखनातील सहजता वाचकालाही आनंद देवून जाते. 'मातीखालची माती' या संग्रहातून साकार झालेले ग्रामीण जीवन सजीवतेचा प्रत्यय देते, वाचकापर्यन्त पोहाचते. हे आनंद यादव यांचे खरे सामर्थ्यस्थान आहे; असे वाटते.

तिस-या प्रकरणामध्ये 'खळाळ' मधील कथांचा समाजाचे आणि व्यक्तिमनाचे चित्रण या संदर्भात विचार केला आहे. आनंद यादव यांना ग्रामीण जीवनानुभव आहे. मातीची ओढ आहे. जाणीवेला कलात्मकला देण्याच्या ध्यासाने मात्र कल्पकतेची ओढ लागली. या छंदातूनच 'खळाळ' मधील अनेक कथांचे लेखन झाले असावे. ग्रामीण मनाच्या दु:खपूर्ण घटनेचे जाणीवपूर्वक चिंतन केले. ग्रामीण वातावरणाचा पार्श्वभूमीप्रमाणे उपयोग करून व्यक्तिमनाच्या चित्रणामध्ये ते रमले. 'धुण' आणि 'मोट' यासारख्या

कथा त्याचे स्पष्ट उदाहरण आहे. परंतु बाकीच्या कथा ह्या रोमॅन्टिक वळणाच्याच झालेल्या दिसून येतात. रोमॅन्टिकतेतच त्यांची कथा अडकून राहिलेने त्यात ग्रामीण जीवनाचे वास्तव असे चित्रण येत नाही. एखाद्या पात्राचे एखाद्याच घटनेबाबतीतले चिंतन म्हणजे ग्रामीण कथा नव्हे. समर्थक, अर्थपूर्ण आणि योजनाबद्द प्रतिमांची मांडणी करून कथारूपाशी भाववृत्तीचा बेमालूम चिरेबंद सांधा जोडला आहे. 'अंजनाची' मानसिक आंदोलने शब्द-बद्द करण्यातच कथा रंगलेली आहे. कथेच्या परिणामासाठी चेतनागुणोक्तीचा वापर, व्यक्तिमनाची सूक्ष्म आंदोलने आणि रोचकतेसाठी लैंगिकतेचा मुक्तहस्ते वापर केला आहे. व्यक्तिमनाच्या तळातील शृंगार भावनेचे अती सूक्ष्मतेने विश्लेषण केले आहे.

अन्नाला महागलेली 'ओझी' वाहणारी माणसं खुळया बंद्रीच्या गो-या देहाकडे बघून नजरतृप्तीने सुख मानू लागली अशी पोकळ दृष्टीची अवास्तव पात्रे निर्माण झाली. ग्रामीण जीवनातलेया दारिद्र्य, जाती-जातीतील संघर्ष, श्रेष्ठ-कनिष्ठता यापैकी कशाचेच चित्रण येत नाही. ग्रामीणतेचा मुखवटा असलेली नागर संस्करणाची त्यांची ही कथा आहे. वाचकाला केवळ शब्दजंजाळामध्ये अडकवून ग्रामीणतेचा भास निर्माण करण्यात त्यांनी फार मोठे यश संपादन केले आहे.

आनंद यादवांच्या 'डवरणी' या कथासंग्रहातील कथांमध्ये शेती या व्यवसायाचे आणि शेतकरी, शेतमजूर यांचे चित्रण 'खळाळ' मधील कथांपेक्षाही कमी प्रमाणात येते. तसेच ग्रामीण जीवनाला व्यापून टाकणा-या दारिद्र्याचे धर्मश्रध्दा, अंधश्रध्दा इ. चे चित्रण अल्प प्रमाणातच येते, ते त्यांच्या कथांचे विषय बनत नाहीत. त्यांच्या कथांतून कौटुंबिक जीवनातील ठराविक नातीच चित्रित होतात. उदा- त्यांच्या कथांतील स्त्री पत्नी, प्रेयसी, आई एवढयाच नात्यानी भेटते व पुरुष नवरा, प्रियकर, बाप एवढयाच नात्याने प्रकट होतो. स्त्री-पुरुषाच्या नात्यामधील विविधता येथे प्रकट होत नाही. वर नमूद केलेले विषय हे त्यांच्या कथा आनुषंगिक स्वरूपाच्या उल्लेखातून निर्दिष्ट होतात. ते त्यांच्या कथांचे विषय बनत नाहीत.

'डवरणी' या कथासंग्रहातील कथांतील व्यक्तिमनाचे चित्रण करीत असताना सामाजिक स्वरूपाची कारणे ते फारशी दाखवीत नाहीत. 'शहाणा-गाव' 'खताची गाडी' या सारख्या कथांचा अपवाद वगळला तर ते सामान्यत: व्यक्तीच्या स्वभाव वैशिष्टयातून व्यक्तिनिष्ठ स्वरूपाच्या अनैतिक वर्तनातून अथवा मानसिक विकृतीतून निर्माण होणा-या ताणाचे चित्रण करतात. या कथांमधून कामुकतेला विषय म्हणून महत्व मिळताना दिसते व लेखकही कामुकतेचे चित्रण करताना रस घेत आहे, असे वाटते. या वैशिष्टयामुळे त्यांच्या कथाचे अस्सल ग्रामीणत्व कमी होते व लोकप्रिय नागर कथालेखकांच्या कथांसारखी यादवांची कथा बनते, असे वाटते. चेतनगुणोक्तीचा वर्णनासाठी अवलंब करणे हे यादवांच्या कथेचे वैशिष्टय या कथांमध्येही आढळते. चांगल्या ग्रामीण साहित्याला जे वर्ज्य म्हणून ग्रामीण साहित्याचे समीक्षक या नात्याने यादवांनी सांगितले आहे त्या वैशिष्टयाची विपुलता 'डवरणी' या कथांमध्ये आढळते. यादवांच्या 'मातीखालची माती', 'खळाळ' व 'डवरणी' या कथासंग्रहांचा एकत्रित विचार करताना अस्सल ग्रामीणत्वाच्या चित्रणाचे प्रमाणे त्यामध्ये उत्तरोत्तर घटत आहे व नागर कथांच्या आशयाची व अभिव्यक्तीची वैशिष्टये क्रमश: वाढली आहेत, असे म्हणावेसे वाटते.

ग्रामीण भागामधील व्यक्तिमन हे समूहाला साद देणारे असते. त्याची समूहाशी असणारी जवळीक त्याच्या उक्तीतून, कृतीतून साकार होत असते. ग्रामीण जीवनातून अगदी सहजतेने ग्रामीण साहित्य अवतरले पाहिजे. सहजस्फूर्त-अनगड भाव साहित्यात यायला हवेत. त्यात अस्वाभाविकतेचा भाग नको आहे. वृत्तपत्रीय बातमी वाचून ग्रामीण साहित्य निर्माण होत नाही. जीवनाच्या अनुभवातूनच ग्रामीण साहित्याची निर्मिती शक्य आहे. अंतरंगाचा अस्सलपणा संपला की चमत्कृती, अनेकविध क्लृप्त्या यांना ऊत येतो. रोचकतेसाठी भडक शब्द, रंजक घटना वापरल्या जातात. असे साहित्य हे अस्सलपणाचा अनुभव देण्याऐवजी त्यातील पोकळी दाखविते. अनुभवाशिवाय लेखन ही केवळ कारागिरी वाटते. तेथे सहजनिर्मितीचा भाग येत नाही. नागर साहित्यिकाचा ग्रामीण साहित्यावर एक प्रकारे जुलूम वाटतो. 'मातीखालची माती' मधील लेखनाची सहजता नंतरच्या 'खळाळ' मध्ये येत नाही. तर 'डवरणी' ने व्यक्तिकेंद्रितता अवलंबिली. ग्रामीणता संपून नागरीकरणाचे आक्रमण दिसते.

परिशिष्ट १

आनंद यादव यांचे स्वतंत्र ग्रंथलेखन -

१. हिरवे जग - कविता १९६०
२. मळ्याची माती - कविता १९७८
३. मातीखालची माती - व्यक्तिचित्रे १९६५
४. खळाळ - कथा १९६७
५. आदिताल - कथा १९८०
६. डवरणी - कथा १९८२
७. घरजावई - विनोदी कथा १९७४
८. माळावरची मैना - विनोदी कथा १९७८
९. गोतावळा - कादंबरी १९७१
१०. एकलकोंडा - कादंबरी १९८०
११. नटरंग - कादंबरी १९८०
१२. माऊली - कादंबरी १९८२
१३. स्पर्शकमळे - ललित लेख १९७८
१४. पाणभवरे - ललित लेख १९८२
१५. रात डोंगराची - वग नाट्य १९७७
१६. ग्रामीण साहित्य:स्वरूप आणि समस्या, वैचारिक मीमांसा,१९७९
१७. ग्रामीणता: साहित्य आणि वास्तव, वैचारिक मीमांसा,१९८१
१८. मराठी साहित्य:समाज आणि संस्कृती,वैचारिक मीमांसा,१९८५

पीएच्.डी. प्रबंध
"मराठी लघुनिबंधाची प्रेरणा, प्रवृत्ती आणि त्याचा विकास"
पुणे विद्यापीठ
प्रपाठक,मराठी विभाग,पुणे विद्यापीठ,पुणे.

साधन ग्रंथ सूची -


१. अण्णाभाऊ साठे, 'कृष्णाकाठच्या कथा', मॅजिस्टिक प्रकाशन मुंबई ४, द्वितीयावृत्ती, १९७७

२. अण्णाभाऊ साठे, 'बरबाद्या कंजारी', विद्यार्थी प्रकाशन, पुणे ९, १९६०

३. संपा. अरविंद गोखले, व्यंकटेश माडगूळकर यांची कथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९६४.

४. आनंद यादव, 'आदिताल', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८०.

५. आनंद यादव, 'माळावरची मैना', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे १९७६.

६. आनंद यादव, 'मळ्याची माती', मेहता पब्लिशिंग, हाऊस, पुणे, १९७८.

७. आनंद यादव, 'नटरंग', मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९८०

८. आनंद यादव, 'स्पर्श कमळे', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, पुनर्मुद्रण, १९८४.

९. आनंद यादव, 'माऊली' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे १९८४

१०. आनंद यादव, 'ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि समस्या' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, १९७९.

११· आनंद यादव, 'ग्रामीणता:साहित्य आणि वास्तव' मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे ३०,१९८१·

१२· आनंद यादव, 'मराठी साहित्य:समाज आणि संस्कृती' मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे ३०,१९८५

१३· संपा·आनंद यादव, बाबा पाटील, 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा·' मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे ३०,१९८१·

१४· इरावती कर्वे 'हिंदू समाज:एक अन्वयार्थ', प्रकाशक दि·धो·कर्वे, मुलरेघडी पुणे ९,१९७५·

१५· [illegible]ग्वेदी, 'आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास', प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, तिसरी आवृत्ती,१९७९·

१६· ग·दि·माडगूळकर, 'कृष्णाची करंगळी,' कुलकर्णी ग्रंथागार, पुणे ३०, द्वितीयावृत्ती,१९७९·

१७· ग·दि·माडगूळकर, 'चंदनी उदबत्ती', कुलकर्णी ग्रंथागार, पुणे, २, १९६७·

१८· गंगाधर गाडगीळ, 'खडक आणि पाणी', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,१९६६

१९· गंगाधर गाडगीळ, 'साहित्याचे मानदंड', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६२·

२०· गंगाधर गाडगीळ, 'पाण्यावरची अक्षरे', सुविचार प्रकाशन, मंडळ, पुणे १९७९·

२१· चंद्रकांत बांदिवडेकर, 'मराठी कादंबरी: चिंतन आणि समीक्षा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, १९८३·

२२· दुर्गा भागवत, 'धर्म आणि लोकसाहित्य', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, ३४, १९७५

२३· दा·वि·कुलकर्णी, 'मराठी कथा: स्वरूप आणि आस्वाद·', स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन, पुणे, १९७६·

२४· नागनाथ कोतापल्ले, 'ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि शोध' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, १९८५·

२५· संपा·पंडित कुलकर्णी, आनंद यादव 'मातीतले मोती,' कुलकर्णी ग्रंथागार, पुणे ३०, १९७०·

२६· प्रभाकर मांडे, 'लोकसाहित्याचे अंत:प्रवाह', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०, १९७५·

२७· प्रल्हाद वडेर, 'अनुभव आणि आकार,' मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, ३०, १९७९·

२८· संपा·भालचंद्र फडके, 'अरविंद गोखले यांची कथा', कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे ३०, १९७३·

२९· भालचंद्र फडके, 'दलित साहित्य: वेदना आणि विद्रोह' श्रीविद्या प्रकाशन, पुणे ३०, १९७७·

३०. म. सु. पाटील, 'अक्षरवाटा,' अनमोल प्रकाशन, बुधवार पेठ, पुणे २, १९८२

३१. रा.ग.जाधव, 'निळी क्षितिजे,' अमेय प्रकाशन, धनतोळी, नागपूर, १९८२.

३२. रा.ग.जाधव, 'वाङ्‌मयीन आकलन,' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७७.

३३. रा.ग.जाधव, 'निळी पहाट,' श्री. विद्या प्रकाशन, पुणे ३० द्वितीयावृत्ती १९७९.

३४. रा.ग.जाधव, 'साहित्य आणि सामाजिक संदर्भ,' कान्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०, १९७५.

३५. वामन कृष्ण चोरघडे, 'संपूर्ण चोरघडे,' विदर्भ मराठवाडा बुक कंपनी पुणे २, १९६३.

३६. संपा. आणि प्रस्तावना वा.ल.कुलकर्णी, 'निवडक शंकर पाटील,' नवमहाराष्ट्र प्रकाशन, पुणे २, १९६६.

३७. विजया राजाध्यक्ष, 'संवाद,' ग्रंथाची वाचक चळवळ कुर्ला मुंबई २४, १९८५.

३८. विनायक कृष्ण जोशी, 'लोकनाटयाची परंपरा,' ठोकळ प्रकाशन, पुणे २, १९६२.

३९. संपा. वि.स.खांडेकर, 'पाच कथाकर,' कान्टिनेटल प्रकाशन, पुणे ३० चौथी आवृती १९६४.

४०. व्यंकटेश माडगूळकर, 'माणदेश माणसं,' कान्टिनेटल प्रकाशन, पुणे ३०, प्रथमावृत्ती १९४९, पुर्नमुद्रण १९८०

४१· व्यंकटेश माडगूळकर, 'काळी आई,' मौज प्रकाशन गृह, मुंबई ४ दुसरी आवृत्ती, १९६२·

४२· व्यंकटेश माडगूळकर, 'गावाकडच्या गोष्टी,' उत्कर्ष प्रकाशन, पुणे ४, तिसरी आवृत्ती, १९८२

४३· व्यंकटेश माडगूळकर, 'हस्ताचा पाऊस,' उत्कर्ष प्रकाशन पुणे ४, तिसरी आवृत्ती, १९८३

४४· व्यंकटेश माडगूळकर, 'जांभळाचे दिवस,' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०, तृतीयावृत्ती, १९७६·

४५· व्यंकटेश माडगूळकर, 'रानमेवा,' श्री विद्या प्रकाशन, शनिवार पुणे ३०, १९७८

४६· शंकर पाटील, 'शंकर कथा,' इंद्रायणी साहित्य शनवार पेठ, पुणे ३०, १९८२·

४७· शंकर पाटील, 'भेटीगाठी,' इंद्रायणी साहित्य शनवार पेठ, पुणे ३०, १९८२·

४८· शंकर पाटील, 'वळीव,' इंद्रायणी साहित्य, पुणे ३०, १९८२·

४९· शंकर पाटील, 'ऊन,' इद्रायणी साहित्य सदाशिव पेठ, पुणे ३०, १९८०·

५०· संपा· श्री·पु·भागवत, 'गाडगीळांच्या कथा,' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०, तृतीयावृत्ती, १९८१·

५१· श्री·म·माटे, 'माणसकीचा गहिंवर', प्रकाशक लक्ष्मीबाई श्री·माटे, नातू बाग, पुणे, प्रथमावृत्ती, १९४९· पुर्नमुद्रण १९६८·

५२· श्री·म·माटे, 'उपेक्षिताचे अंतरंग,' प्रकाशक लक्ष्मीबाई श्री·माटे, प्रथमावृत्ती १९४१, बारावी आवृत्ती, १९६६·

५३· सरोजिनी बाबर, 'लोकसाहित्य,' साजशिणगार, महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती मुंबई येथे लोकसाहित्य संमेलन, १९६५

५४· सरोजिनी बाबर, 'महाराष्ट्र: लोकसंस्कृती व साहित्य,' नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, १९७३·


वृत्तपत्रे व नियतकालिके


१· 'अस्मितादर्श,' म·रा·साहित्य संस्कृती मंडळ, औरंगाबाद, एप्रिल/मे/जून, १९८६, वर्ष १९ अंक २·

२· 'प्रतिष्ठान,' मे. १९८६, वर्ष १८ अंक १, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद

३· 'बळीराजा,' ग्रामीण साहित्य विशेषांक, दिवाळी अंक ८४, कृषि विज्ञान, प्रकाशन पुणे ३०·

४· 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका,' पुणे ग्रामीण साहित्य विशेषांक, जुलै ते डिसेंबर १९८०, अंक २१४-२१५·

५· 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका,' पुणे एप्रिल १९८१ ते जून १९८१, अंक २१७·

६· 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका,' पुणे ऑक्टो·१९८१ ते डिसें·१९८१, अंक २१९·

७· 'सकाळ,' रविवार सकाळ कोल्हापूर दि·१ ऑगस्ट १९८१·

८· 'सकाळ,' रविवार सकाळ कोल्हापूर, दि·२७ ऑक्टो·१९८६·

९· 'साधना' पुणे महिला समस्या विशेषांक, १५ ऑगस्ट १९८४, वर्ष ३७, अंक १, २·